जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७३४ दिनांक - ०६/१०/२०२३**

**विश्रांतवाडी पो स्टे पुणे शहर**

**नागरीकांचे एटीएम कार्ड हातचलाखीने घेवुन बँकेचे खात्यामधुन डेबीट कार्डद्वारे वेग-वेगळ्या एटीएम सेंटर मधुन रक्कम काढुन फसवणुक करणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद**

यातील फिर्यादी हे दि.२२/०९/२०२३ रोजी महालक्ष्मी विहार सोसायटी,विश्रांतवाडी चौक,पुणे येथील बँकेचे एटीएम सेंटर मध्ये पैसे काढण्यासाठी गेले असताना,सदर ठिकाणी नमुद दोन अनोळखी इसमांनी संगनमत करून, फिर्यादी यांचेकडुन त्यांचे पत्नी हिचे नावाचे डेबीटकार्ड हातचलाखीने घेवुन बँकेचे अंकाऊट मधुन डेबीटकार्डद्वारे वेग-वेगळ्या ठिकाणी एटीएम सेंटर मधुन रोख रक्कम काढुन व काही वस्तु खरेदी करुन फिर्यादी यांची एकुण ८७,५८०/- रू किची अप्रामाणिकपणे फसवणुक केली म्हणुन सदर अनोळखी इसमाविरोधात **विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर गु.र.क्र.२७३/२०२३ भा.द.वि.क.४२०,३४** अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी बाबत गुप्त बातमीदारमार्फेत पोलीस अंमलदार,मोरे व खराडे यांना माहिती मिळाली की,सदर इसम हे कस्तुरबा होसिंग सोसायटीकडे जाणा-्या रोडजवळील सारस्वत बँकेच्या एटीएम जवळ, विश्रांतवाडी,पुणे येथे येणार आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाली.

दि.०१/१०/२०२३ रोजी सदर बातमीचे अनुशंगाने पोलीस उप-निरीक्षक,महेश चव्हाण व इतर स्टाफसह सदर ठिकाणी सापळा लावुन थांबले असता,फिर्यादी यांनी दिलेल्या आरोपीचे वर्णनाप्रमाणे दोन इसम हे लाल रंगाच्या मोटार सायकल क्र.MH/12/EZ-3386 हिचेवरून बँकेच्या जवळ आल्याचे दिसल्याने त्यांना थांबण्याचा इशारा केला असता,त्यांना संशय आल्याने ते पळून जावु लागले. त्यावेळी पो.उपनि.चव्हाण यांनी सोबतच्या स्टाफच्या मदतीने शिताफीने **१)मयंककुमार संतराम सोनकर,वय-२७ वर्षे,रा.व्दारका सकुंल अपार्टमेंट,परांडेनगर,धानोरी,पुणे मुळगांव-मु.पो.मोदाहा जि. हमीपुर,राज्य उत्तर प्रदेश २)कपील राजाराम वर्मा,वय-३० वर्षे,सकुंल अपार्टमेंट, परांडे नगर, धानोरी,पुणे मुळगांव-मु.पो. बडनी जिल्हा प्रतापगड राज्य उत्तर प्रदेश** यांना ताब्यात घेतले आहे. दोन पंचा समक्ष सदर इसमांची अंगझडती घेतली असता,आरोपी मयंककुमार सोनकर याचे पॅन्टीच्या खिश्यामध्ये वेग-वेगळ्या बँकेची १६ डेबिट कार्ड व त्यामध्ये वर नमुद गुन्ह्यातील फिर्यादी यांचे पत्नीचे नावाचे एसबीआय बँकेचे डेबिट कार्ड व रोख रक्कम ४५००/- रुपये मिळुन आले आहेत. सदरचा ऐवज गुन्ह्याचे पुराव्याकामी जप्त करण्यात आले. दुसरा आरोपी कपील वर्मा यांचे पॅन्टच्या खिश्या मध्ये ०९ वेग-वेगळ्या बँकेची ०९ डेबिट कार्ड मिळुन आली. सदर दोन्ही आरोपीकडे डेबिट कार्डबाबत विचारणा केली असता त्यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही. तसेच त्याचे ताब्यातील लाल रंगाची मो.सायकल क्र.MH/12/EZ-3386 हिचेबाबत त्याची कागदपत्रे व मालकी हक्काबाबत विचारणा केली असता,त्यांनी उडवा-उडवीचे उत्तर दिल्याने सदर मोटार सायकलदेखील पंचासमक्ष जप्त केली आहे. सदर आरोपी यांचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने अधिक तपास केला असता, त्यांनी वरील गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना वरील गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपीकडे अधिक तपास केला असता,आरोपींचा वरील गुन्हया व्यतिरिक्त विश्रांतवाडी पोलीस ठाणे गु.र.क्र.२७९/२३,भादवि कलम ४२०,३४ व गुरक्र.२८१/२३ कलम ४२०,३४ या गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पण झाले आहे. तपासा दरम्यान आरोपीकडुन वरील नमुद गुन्ह्यातील फिर्यादी यांचे एटीएम कार्डद्वारे खरेदी केलेले ६.९ ग्रॅम वजनाचे सोने किंमत ४५,०००/- रुपये, रोख रक्कम ४९,७००/- रुपये व मो.सायकल होंन्डा स्टनर ५०,०००/- रुपये किची तसेच वेग-वेगळ्या बँकेची एकुण ६२ डेबिट कार्ड हस्तगत करण्यात आली आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्वे प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ-०४,पुणे,श्री.शशीकांत बोराटे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,खडकी विभाग,पुणे,श्रीमती.आरती बनसोडे वरिठ पोलीस निरीक्षक,श्री.दतात्रय भापकर, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.भालचंद्र ढवळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक,महेश चव्हाण, पोलीस अंमलदार, चव्हाण, भोसले, बादेरे, मोरे, देवकाते, खराडे व पिसाळ यांनी केली आहे.